# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१८/०६/२०२०

## जबरी चोरी, लुटमारीचे गुन्हे करणा-या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना अटक
## सुमारे चार लाखाचा सोन्याचा ऐवज हस्तगत
## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात घडणा-या जबरी चोरी, लुटमारीचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांबाबत प्रभावी मोहीम राबवुन त्यांचा शोध घेवून अटक करणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सो. यांनी गुन्हे शाखेंना आदेशीत केले आहे. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची पथके तयार करुन पोलीस ठाणेंकडे दाखल गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार व पोलीस नाईक जयवंत राऊत यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, चाकण पोलीस ठाणे अंतर्गत म्हाळुंगे पोलीस चौकी गुन्हा रजिस्टर नंबर ७११/२०२० भा.द.वि.स.कलम ३९७,३९४,३४ आर्म ॲक्ट कलम ४ (२५) प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी प्रदीप नंदकुमार निगडकर हे त्यांचे अल्टो कारने देहूगाव येथुन जात असतांना हॉटेल ड्रायव्हर धाब्याचे समोर आले असतांना चार इसमांनी मोटार सायकलीवरुन लोखंडी कोयत्या सारखी धारदार शस्त्रासह येवून तुझ्या गाडीतील टेपचा आवाज मोठा का केला असे म्हणुन गाडीचे समोरील काचेवर लोखंडी कोयता मारत फिा यास थांबवुन मारहाण केली व झटापटी करुन सोन्याची चैन, मोबाईल असे साहीत्य जबरदस्तीने काढून घेतल्याने गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील तीन आरोपी हे दळवीनगर परिसरात आले असल्याची बातमी मिळालेने पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार, पोहवा शिवानंद स्वामी, प्रमोद वेताळ, दिपक खरात, केराप्पा माने, मपोहवा उषा दळे, पोना जयवंत राऊत, पोकॉ नामदेव राऊत, अजित सानप यांनी दळवीनगर परिसरात सापळा लावुन थांबले असतांना सदर आरोपीत यांना पोलीस आल्याची चाहूल लागल्याने ते पळुन जावु लागले. त्यांचा पाठलाग करुन गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकलींसह पकडले. आरोपींची नावे १) राकेश किरण उर्फ बाळासाहेब गंगावणे वय २७ वर्षे, धंदा- हॉटेल कामगार रा.पुजा प्रोव्हीजन स्टोअर्सच्या बाजुला दळवीनगर चिंचवड २) शुभम नंदू आवतारे वय २४ वर्षे धंदा- मजुरी रा. बारणेचाळ क्रांतीनगर थेरगाव पुणे ३) सुरज नारायण कांबळे वय २१ वर्षे धंदा- मजुरी रा. सदर अशी असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे कब्जातून ९ तोळे वजनाची सोन्याची चैन (गोफ) व गुन्हयात वापरलेल्या दोन मोटर सायकली असा एकूण ४,०८,०००/- रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.आरोपीत हे पोलीस रेकॉर्डवरील घातक हत्यारांचा धाक दाखवुन जबरी चोरी, लुटमारी, गर्दी मारामारी करणारे गुन्हेगार असुन त्यांचेवर पिंपरी, चिंचवड, निगडी, चाकण पोलीस ठाणेंकडे सुमारे २० गुन्हे दाखल आहेत. आरोपीत यांचेकडे कसुन तपास करता चिंचवड पोलीस ठाणेकडील दोन व निगडी पोलीस ठाणेकडील एका गुन्हयामध्ये पाहीजे असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीत यांना चाकण पोलीस ठाणे अंतर्गत म्हाळुंगे पोलीस चौकीकडील गुन्हयात हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार ,पोलीस कर्मचारी प्रमोद वेताळ, दिपक खरात, शिवानंद स्वामी, केराप्पा माने ,वसंत खोमणे, उषा दळे, विपूल जाधव, चेतन मुंढे, जमीर तांबोळी, जयवंत राऊत, नामदेव राऊत, अजित सानप, नामदेव कापसे, आतिष कुडके यांचे पथकाने केली आहे.




सद्रक्षणाय खलनिग्रहणाय